निविदा सूचना जिपउ/तां/निविदा/ १९५०/२००९,नंदुरबार दिनांक २१/०८/२००९

----------------------------------------------------------------------------------------

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**,नंदुरबार यांचे कार्यालय,
कक्ष क्र.७,मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नंदुरबार.

# निविदा प्रपत्र

## जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,नंदुरबार येथील द्रवनत्र वाहतुकीसाठी निविदा सूचना

**निविदा दाखल करणा-याचे नाव व पत्ता :--------------------------------**
**--------------------------------**
**--------------------------------**

(दाखल पान क्र.१ ते ४ )

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे कार्यालय.**
**फेर निविदा सुंचना**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार जिल्हयात खालील कामासाठी दिनांक-०१/१०/२००९ पासुन दिनांक- ३०/६/२०१० पर्यन्त या कालावधीसाठी वाहतुक कॉन्ट्रक्टदार यांचे कडुन मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | उपकेंद्राची संख्या | वाहन पुरविण्याचा दिवस. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथील रिकामे द्रवनत्र पात्रे महाराष्ट्रातुन अथवा इतर राज्यातुन द्रवनत्र भरुन आणून नंदुरबार जिल्हयातील उपकेंद्रांना वाटप करणे. | नंदुरबार जिल्हयातील कृत्रिम रेतन उपकेंद्रे | प्रत्येक महिण्याचे ठरावीक तारखेस कार्यक्रम दिला जाईल.त्या प्रमाणे वाहन उपलब्ध करुन द्यावे. |
| २ | पशुसंवर्धन खात्यातील इतर कामासाठी वाहन उपलब्ध करुन देणे | ------ | ------ |

(१) निविदेचे कोरे फार्म ,नियम व अटी ,निविदेसोबत भरावयाचा रक्कमेचा तपशिल इ. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांच्या कार्यालयात रोख रक्कम रुपये-२५०/- (अक्षरी दोनशे पन्नास मात्र ) ना परतावा भरुन सुट्टीचे दिवस सोडुन.दिनांकः- ०४/०९/२००९ ते १६/०९/२००९ पर्यन्त कार्यालयीन वेळेत मिळु शकतील.

(२) निविदा पाकीटावर द्रवनत्र व इतर वाहतुकीसाठी असे लिहुन पाकीट मोहोरबंद करून दोन पाकीट पध्दत अवलंबून(अ) पहिल्या पाकीटात जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे नावाचा स्टेट बॅन्क ऑफ इंडिया नंदुरबार शाखेचा रूपये-५०००/-(अक्षरी रूपये पाच हजार फक्त) या रेखांकीत नसलेला डिमान्ड ड्राप्ट, बॅन्कर्स चेक गाडीचे कागदपत्र जसे नोंदणी पुस्तक, टॅक्स बुक, नुतनीकरणृ केलेला परवाना,इन्कमटॅक्स रिटनर्स ,पॅन कार्डाच्या साक्षांकीत प्रति इत्यादी असाव्यात.(ब) दुस-या पाकीटात दरपत्रके जिल्हयाबाहेर व जिल्हांतर्गत वाहतुकीचे दर अंकी व अक्षरी स्पष्ट लिहावे व दोन्ही पाकीटे स्वतंत्रपणे मोहोरबंद करून तिस-या पाकीटात घालुन तेही मोहोरबंद करुन **हे पाकीट जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार प्रशासकिय इमारत रुम नं.७ या पत्यावर** दि. १७/०९/२००९ रोजी दोन वाजे पावेतो पाहचेल अशा बेताने पाठवावे .त्या नंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

(३) प्राप्त निविदा समिती समक्ष दिनांक- १७/०९/२००९ रोजी १६-०० वाजता उघडण्यात येतील

(४) एखादी अगर सर्व निवीदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निविदा समितने राखून ठेवला आहे.

(५) द्रवनत्र व इतर कामासाठी माल मिळण्यास काही खोळंबा झाल्यास त्या बद्द्ल हॅलटिंग चार्ज मुक्काम भत्ता मिळणार नाही.

(६) दिनांक- ३०/०६/२०१० नंतर पुढील कालावधीसाठी निविदा उघडण्याची प्रक्रीया पूर्ण होई पर्यन्त या निविदेत निश्चित केलेल्या दरानेच वाहतुक करावी लागेल.

(डॉ.एस.बी.तटवर्ती )
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**नंदुरबार**

जा.क.जिपउ/तां/निविदा/ १९५०/२००९,नंदुरबार
दिनांक २१/०८/२००९

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार

द्रवनत्र व द्रवनत्र पात्रांच्या वाहतुकी संबधी नियम व अटीः-

१. वाहतुक कंत्राटदाराने जिल्हाअंर्तगत व जिल्हयाबाहेरील अंतराचे प्रति किलोमिटरचे दर द्यावे. त्यात मुक्कामाच्या आकाराचा समावेश करू नये. तसेच मुक्काम झाल्यास त्याचा वेगळा दर दिला जाणारा नाही. एकदा मान्य केलेल्या वाहतुक दरामध्ये कोणतीही दरवाढ (पेट्रोल, डिझेल, ऑईल इ.) कारणास्तव वाढ दिली जाणार नाही. निगोसिएशन (मध्यस्थी) व्दारे आवश्यक ते दर शिफारस करण्याचे अधिकार समितीला राहतील.

२. वाहन दुरुस्ती, देखभाल वाहन कर, रोड टॅक्स इ. वाहनासाठी लागणारा खर्च वाहतूक कंत्राटदाराने करावयाचा आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकाराचा दाखला व प्रमाणपत्र किंवा खर्च दिला जाणार नाही.

३. द्रवनत्र पात्राची वाहतुक व रेतमात्राचे वाटप करते वेळी प्रत्येक वेळी आमचा एक प्रतिनिधी बरोबर राहिल.

४. द्रवनत्र पात्रे व शासकिय साहित्य (विर्यमात्रा पात्र) वाहनात चढविणे , उतरविणे व वाहून नेणे याची संपूर्ण जबाबदारी सर्वस्वी वाहतूक कंत्राटदाराची राहिल. त्याचा वेगळा आकार दिला जाणार नाही.

५. वाहतुकीसाठी आगावू अग्रिम रक्कम दिली जाणार नाही.

६. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार यांनी दिलेल्या कार्यक्रमानुसार वाहतुक कंत्राटदाराने वाहनाची व्यवस्था करावयाची आहे. काही कारणाने नियोजीत मार्गावरील पुरवठा पुढे ढकलल्यास कंत्राटदाराचे वाहन परत पाठविण्यात येईल. त्या बाबत कोणताही आकार मिळणार नाही.

७. वाहतूक भाडे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार ते परत जिल्हा कृत्रिम रेतन केद्र, नंदुरबार पर्यंतच वाहतुक कंत्राटदाराने आकारावयाचे आहे. प्रत्येक मार्गाचे अंतर हे ठरलेले आहे. व त्या नुसार कंत्राटदारास देय रक्कम चेकने अदा केली जाईल.

८. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार यांनी ठरवून दिलेल्या वेळेत कंत्राटदारास वाहन द्रवनत्र वाहतुकीसाठी व विर्यमात्रा वाटपासाठी उपलब्ध करून द्यावे लागेल. दोन्ही कामे बरोबरीने एकाच वेळी केली जातील. या व्यतिरिक्त इतर शासकिय कामासाठी सदर दराने मागणीनुसार वाहन उपलब्ध करून द्यावे लागेल.

९. वाहतुक कंत्राटदाराचे वाहन अद्ययावत असले पाहिजे जेणे करून द्रवनत्र विर्यमात्रा पात्र द्रवनत्र पात्राचे ऊन, वारा व पाऊस या पासुन संरक्षण मिळणे वाहनांत ज्या जागेवर (फ्लोअर) द्रवनत्र पात्र व विर्यमात्रा पात्र ठेवणार त्या जागी जाड चटईचे आच्छादन असावे. निवदा उघडण्याच्या वेळी/दिवशी वाहन निरीक्षणासाठी हजर करावे लागेल. वाहनाला हुड असणे आवश्यक आहे. व ती ताडपत्री किंवा जाड प्लॅस्टिकच्या कागदाने किंवा पत्र्याने आच्छादलेली असावी. चटईचे आच्छादन नसल्याचे आढळल्यास प्रतीदिन रूपये ५०/- दंड आकारणी करून बिलातुन वजा केली जाईल.

१०. द्रवनत्र पात्राचे तथा विर्यमात्रा पात्राचे वाहतुक होत असतांना द्रवनत्र पात्रे व विर्यमात्रा पात्रे वाहतुक कंत्राटदाराच्या ताब्यात असेल. त्या वेळी द्रवनत्र व द्रवनत्र पात्रे तथा विर्यमात्रा पात्रांची वाहतुक करीत असतांना सदर मालमत्तेच्या नुकसानासाठी / कमतरता किंवा तुटफूट इ. साठी वाहतुक कंत्राटदार जबाबदार राहिल.

१) द्रवनत्र पात्राची व विर्यमात्रा पात्रांची वाहतुक करीत असतांना कंत्राटदारास कोणत्याही माणसास अथवा कुठल्याही प्रकारचे सामान इत्यादी सदर वाहनामध्ये वाहतुक करता येणार नाही. असे आढळून आसल्यास कंत्राटदार रूपये ५००/- किंवा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार ठरवतील तेवढया रकमेच्या दंडास पात्र राहतील.

२) निविदा सोबत रक्कम रूपये ५०००/- इतकी बयाणा रक्कम म्हणून जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नांवे काढलेला स्टेट बॅक ऑफ इंडीयाचा नंदुरबार शाखेचा रेखांकित नसलेला (क्रॉस नसलेला) डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. त्यावर कोणतेही व्याज मागता येणार नाही. सदर डिमांड ड्राफ्ट अंतीमतः मान्य झाल्यावर परत करण्यात येईल.

३) त्या प्रमाणे निवदी संबंधिच्या अटी व पत्रकाची एक प्रत त्यावर निवीदा अटी मान्य आहे असे लिहून स्वाक्षरी करून निवीदा सोबत जोडलेली पाहिजे.

४) ज्यांची निवदा स्विकृत केली जाईल त्याची अनामत रक्कम रूपये १५०००/- खालील १५-१७ अन्वये कार्यवाही केली जाईल.

५)वाहतुक कंत्राट घेतल्या नंतर वाहतुक कंत्राटदारास रूपये १५०००/- अनामत रक्कम म्हणून कोषागारात चलनाने सात दिवसाच्या आत भरावी लागेल. अन्यथा त्याची बयाणा रक्कम जप्त करून त्यांची निवीदा रद्द केली जाईल.

६) अनामत रक्कम रू. १५०००/- वर कुठल्याही प्रकारचे व्याज मागता येणार नाही. निवीदा काळ संपल्यानंतर कंत्राटदाराने मागणी नुसार समाधान कारक काम केलेले असेल व काही नुकसान केले नसेल तरच अनामत रक्कम परत केली जाईल.

७)वाहतुक कंत्राटदारास निवीदा मंजुर झाल्यापासून तीन दिवसाच्या आत १५३/- या रकमेच्या बाँड पेपरवर विहीत नमुन्यात वाहतुक संबंधिचा करार नामा लिहून द्यावा लागेल.

८)वाहतुक कंत्राटदारास वाहतुक केल्याचे प्रत्येक फेरीचे देयक दोन प्रतीत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार या नावाने सादर करावे.

९) वाहतुक कंत्राटदाराचा कालावधी ०१/०९/२००९ ते दिनांक ३०/०६/२०१० अथवा नविन कंत्राट होई पर्यंत राहिल.

१०)वाहतुक कंत्राटदारासंबंधिच्या अटीचे पालन वाहतुक कंत्राटदाराकडून न झाल्यास व वाहतहुकीचे काम असमाधानकारक वाटल्यास वाहतुक कंत्राट रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांना राहिल. अशा वेळी कंत्राटदाराने भरलेली अनामत रक्कम रूपये १५०००/- जप्त करण्यात येवून सदर ठेव शासनाकडे जमा करण्यात येईल .

११)कंत्राटदाराबाबत कोणत्याही मुद्दयावर वाद उपस्थित झाल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचा निर्णय अंतीम राहिल. व तो पूर्णपणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल. या वर कंत्राटदाराचे स्पटीकरण मान्य केले जाणार नाही.

१२)आपण दिलेल्या निवीदेमध्ये जर इतर सर्व खर्च करण्याचा त्यात अंर्तभाव असे ग्राह्य मानले जाईल व या संदर्भात कोणताही कर वेगळा दिला जाणार नाही. प्रत्येक वाहतुकीच्या वेळी जकात माफीचे प्रमाणपत्र दिले जाईल व सदर प्रमाणपत्र संबंधित महापालिकेच्या हद्दीत प्रवेश करतांना त्या महापालिकेच्या जकात नाका अधिकाऱ्यास सादर करावे लागेल. त्यामुळे द्रवनत्र इत्यादी जकात माफ करून सोडता येईल. जकात माफीचे प्रमाणपत्र देऊन सुध्दा जकात भरावा लागला तर त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. सदर रक्कम संस्थेकडून अथवा कार्यालयाकडून परत दिली जाणार नाही. पुलाचा टोल टॅक्स लागल्यास कंत्राटदारास तो भरावा लागेल. सदर रक्कम कार्यालयाकडून कंत्राटदारास परत केली जाणार नाही.

१३)शासनाने घालुन दिलेल्या अटी व नियम कंत्राटदारास बंधन कारक राहतील. कंत्राटदाराने वाहतुकी संबंधी कोणत्याही अटी दिल्यास त्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

१४) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक - ७ यांनी दिलेल्या उचीत वेळी जर कंत्राटदाराने वाहनाची व्यवस्था केली नाही. अश्या प्रसंगी संबंधित संस्थेच्या अथवा त्या कार्यालयाने जास्त दराने दुसऱ्या कंत्राटदारकडून वाहतुक करून घेतल्यास मंजुर दरापेक्षा जास्त द्यावी लागलेली रक्कम कंत्राटदारकडून त्याच्या पुढील देयकामधून वसुल करण्यात येईल. किंवा अनामत रकमेतुन वसुल करण्यात येईल्.

१५) द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतूक करताना जर अचानक वाहन वाटेत बंद पडले तर पर्यायी वाहनाची व्यवस्था कंत्राटदाराने ताबडतोब करावी. तथापि लवकरात लवकर वाहन दुरूस्त करून (१ महिन्याच्या आत) उपलब्ध करून द्यावे लागेल.

१६)ठरवून दिलेल्या दिवशी द्रवनत्र आणणे, वाटप करणे व इतर या कामी कंत्राटदाराने वाहन सुस्थितीत उपलब्ध करून न दिल्यास दर दिवशी रूपये २००/- या दराने दंड आकारणेत येइल.

१७) कार्यक्रमानुसार वाहन उपलब्ध करण्या करीता कंत्राटदारास २४ तास अगोदर लेखी अथवा दुरध्वनीवरून सुचना देण्यात येईल. व त्यानुसार वेळेवर वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संपूर्णपणे कंत्राटदारावर राहिल.

१८)द्रवनत्र वाहतुकीबरोबर गोठीत रेतमात्रा प्रत्येक केंद्रास पुरविण्यात येईल्.

१९)वाहतुक कंत्राटदाराने वाहन पुरविताना ते सुस्थितीत असले पाहिजे. तपासणीसाठी वाहन कार्यालयात मुळ कागदपत्रासह हजर करावे लागेल. वाहन निवीदाधारकाचे नावावर असावे.

२०) गाडी सोबत क्लिनर असणे आवश्यक आहे. द्रवनत्र पात्र उचलण्याची जबाबदारी वाहन चालक व क्लिनर यांची राहिल. वाहन सोबत क्लिनर नसल्यास प्रतिदिन रूपये १००/- दंड आकारून तो बिलातुन वसुल केला जाईल.

२१)वाहतुक कंत्राटदारापैकी मागविलेल्या निवीदा कोणतेही कारण न देता निविदा मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा अधिकार निविदा निवड समिती, नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

२२) निवीदा उघडण्याच्या दिवशी निश्चित झालेल्या निवीदा निवड समितीने शिफारस केलेल्या दरामध्ये उक्त कंत्राटाचे कालावधीमध्ये डिझेल, पेट्रोल व ऑईल व इतर कोणत्याही बाबींच्या दरामध्ये बदल झाला तरीही सुरूवातीला निश्चित केलेल्या दरामध्ये बदल केला जाणार नाही. त्या बाबींचे निवेदन स्विकारले जाणार नाही.

२३) निविदा पाकीटावर द्रवनत्र व इतर वाहतुकीसाठी असे पाकिटावर लिहून मोहरबंद करून दोन पाकिट पध्दत अवलंबून -------------

अ. पहिल्या पाकिटात जिल्हा पशुसंवर्धन, नंदुरबार यांच्या नावाचा रेखांकित नसलेला स्टेट बॅंक ऑफ इंडीयाचा नंदुरबार शाखेचा रूपये ५०००/-चा डीमांड ड्राफ्ट व गाडीचे कागदपत्रे (आर.सी. बुक, विमा पॉलसी, रोड टॅक्स भरल्याची पावती, वाहतुकीचा परवाना, आयकर भरल्याचे प्रमाणपत्र, मान केलेल्या अटी व शर्ती) इत्यादी सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती साक्षांकित केलेल्या असाव्यात.

ब. दुसऱ्या पाकिटात दरपत्रके , जिल्हया बाहेर व जिल्हया अंतर्गत अंकी व अक्षरी स्पष्ट लिहावे. दोन्ही पाकिटे स्वतंत्र मोहोरबंद करून तिसऱ्या पाकिटात घालून तेही मोहरबंद करून हे पाकिट जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार,कक्ष क्र.७,मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,टोकरतलाव रोड,नंदुरबार या पत्त्यावर दिनांक १७/०९/२००९ रोजी दुपारी २ वाजे पर्यंत पोहचेल अश्या बेताने पाठवावे. त्या नंतर आलेली निवीदा स्विकारली जाणार नाही.

३४) पशुसंवर्धन खात्याने द्रवनत्र खरेदीचा करार कंपनी मधून द्रवनत्र भरून आणणे असा केल्यास महिनाभरात सहा ते आठ अथवा कमी जास्त फेऱ्या चाळीस ते चव्वेचाळीस द्रवनत्र पात्रे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथून रिकामे द्रवनत्र पुरवठादार कंपनीत नेणे (राज्यात अथवा राज्याबाहेर) व द्रवनत्र भरून सदर कंपनीतून जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार येथे परत आणणे एकदा मंजुर झालेल्या दरानेच पुढील भावबंद करार होईपर्यंत करावे लागेल. ४० ते ४४ द्रवनत्र पात्रे वाहतुकीसाठी वाहनात व्यवस्था असावी.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
नंदुरबार जिल्हा, नंदुरबार